
# चैतन्य लहरी

मे - जून २००५

अंक क्र - ५, ६



# सहस्त्रार पूजा, कबेला : ५-८ मे२००५









# अनुक्रमणिका


- .....संचरोनि राही ह्रदयीं माझ्या ------------------------------- २
- सहस्त्रार पूजा, कबेला : ५-८ मे २००५ वृत्तांत ------------------------ ३
- पृथ्वी - तत्त्व, सहज आश्रम: २१ ऑगस्ट ८३ ------------------------ ४
- अमृतवाणी ---------------------------------------------- ६
- श्रीसूक्त ----------------------------------------------- ७
- पुन: प्रक्षेपण ------------------------------------------- ९
- सहज : कांहीं ऐतिहासिक संदर्भ--------------------------------- ११
- सहस्त्रार दिवस, मुंबई, १९८३ ------------------------------- १४
- गुरुतत्त्व जागृत करणे, इंग्लंड १९८३ भाषण (सारांश) -------------- १५


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, दिनांक १६ एप्रिल २००४ पासून सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटों, कॅलेंडर, चैतन्य लहरी व युवाहष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इंन्फोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणें'' या कंपनी मार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इंन्फोसिस्टीमस ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील. तसेच चैतन्य लहरी मासिकाचे नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठवावा. सदर कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC.
PAUD ROAD, KOTHRUD,PUNE 411 O29. TEL. 020 25286537

# .....संचरोनि राही हृदयीं माझ्या

वैशाख शु.तृतीया अर्थात अक्षय्य तृतीया नुकतीच झाली. या दिवसाचे महत्त्व आपणा सहजयोग्यांना माहीत आहेच. प.पू.श्रीमाताजींनी एक अपूर्व धन नुसते 'तिळा उघड' म्हणावे आणि अनमोल खजाना मिळावा इतक्या सहजतेने आपल्याला दिले म्हणून आपण भाग्यवान. त्या ऐश्वर्यामध्यें घट न होता उलट ते आधिकाधिक वृद्धिंगत करत अहेवपणासारखे सांभाळणे हेच सहजयोगी म्हणून आपले जीवनकार्य व हीच आपली जीवनसाधना. त्यामधें वैयक्तिक व सामूहिक अशा दोन्ही पातळ्या आल्या. हे कर्तव्य पार पाडतांना सहजयोग करायचा एवढ्यावरच समाधान न मानता त्याचेच श्रवण-चिंतन-मनन, संवाद, आदान-प्रदान करत तो आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व त्याचा ध्यास घेतला पाहिजे. ध्यानामधून देवता प्रसन्न होत राहिल्या की त्यांचे दिव्य गुण आपल्यामधें उतरत आहेत याचा प्रत्यय व अनुभव आपला आपल्यालाच आंतमधून उमगत राहतो, ते जाणण्याची सजगता व तरलता आपण मिळवली पाहिजे. हेच आपल्याला ध्यानामधून मिळवायचे आहे.

अक्षय म्हणजे ज्याचा कधीं क्षय होत नाही ते. आपल्याला श्रीमाताजींनी दिलेला प्रसाद अक्षय रहावा ही शुद्ध इच्छा व प्रयत्न असला की भक्तिमार्गावर ज्ञानदीपाचा प्रकाश आपोआप येतो. म्हणून 'परंतु तेथे भगवंताचे ! आधिष्ठान पाहिजे'या समर्थ -उक्ती प्रमाणें श्रीमाताजींना आपण अक्षयपणें हृदयांत धारण केले पाहिजे. ही भावना हृदयांत निर्माण होत असते व त्याचा आनंदही हृदयांतच झिरपत राहतो. आपणही हीच धारणा हृदयांत बाळगूं या व त्यासाठीं '' संचरोनि

# सहस्रार पूजा, कबेला : ५-८ मे २००५

## वृत्तांत

सहस्रार पूजा समारोह कबेला येथें ५ ते ८ मे २००५ या दिवसांत संपन्न झाला.

५ मे पासूनच अनेक ठिकाणांहून आलेले सहजयोगी पूजास्थानी जमूं लागले होते. पहिल्या दिवशींच त्यांची संख्या२००-२५० होती. पहिल्या दिवशी सहजयोगी पूजा-समारोहाच्या तयारीतच गुंतले होते. पूजेचे आयोजन करणाऱ्या देशांतील सहजयोग्यांनी श्रीमाताजींच्या निवासस्थानी पुष्पगुच्छ आणले व माताजींसमोर एक -एक भजन म्हटले.

६ मे रोजी सकाळीं सर्व सहजयोग्यांनी प्रथम सामूहिक ध्यान केले व सर्वजण आपापल्या कामाला लागले. कांहींजण एकमेकांना स्वच्छ करत होते. पूजेआधीं बरेच जण स्वतःला व इतरांना स्वच्छ करण्याबद्दल जागरूक व प्रयत्नशील होते. सायंकाळी भजने, नृत्य व कव्वाली असा कार्यक्रम झाला.

७मे ला सकाळचे ध्यान झाले व तोपर्यंत सहजयोग्यांची उपस्थिति आणखीनच वाढू लागली. पूजेसाठीचा हँगर (मंडप) कमी पडूं लागल्यामुळें दुसरी व्यवस्था करावी लागली. प्रसाद-भोजनाच्या तयारीसाठीं अनेकजण पुढें आले. एकमेकांना व्हायब्रेशन्स देणें,सहजसाहित्याची खरेदी, भेटी-गप्पा इ.मधे योगी दंग होते. बाजूला भजन, नृत्य, कव्वाली इ.चाही सराव होत होता.

८ मे हा पूजेचा दिवस. सकाळचे ध्यान झाल्यावर सर्वजण स्वतःला व इतरांना पूजेसाठीं अधिक स्वच्छ करण्याच्या मागे लागले होते. हँगर व व्यासपीठावर सगळीकडे आकर्षक सजावट करण्यात आली होती. सायं. ७:० वा. सर्वजण पूजेसाठी जमले, सर्वांनी श्रीमाताजींच्या आगमनाआधीं ध्यान केले. साधारण ८:० वाजता श्रीमाताजींचे प्रसन्न व तेजस्वी रूपात आगमन झाले. लहान मुलांनी त्यांच्या चरणांवर फुले वाहिली व योगिनींनी लक्ष्मी-पूजा केल्यावर आरती झाली. श्रीमाताजींनी प्रसन्न होऊन पूजेचा स्वीकार केला व सर्वांना आशीर्वादित करून त्या निवास-स्थानाकडे परतल्या. त्यानंतर सर्व सहजयोग्यांनी संगीत-भजन-नृत्य-कव्वाली समवेत सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेतला

•••

# पृथ्वी - तत्त्व

## प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे प्रवचन, सहजआश्रम: २१ ऑगस्ट ८३

सहजयोगामधें पृथ्वी-तत्त्व फार महत्त्वपूर्ण असल्यामुळें आपण ते नीट समजून घेतले पाहिजे. भूमातेकडून सहजयोग्यांना अनेक आशीर्वाद मिळाले आहेत व ती तुमची खूप काळजी घेत असते. सृष्टीमधें जे कांहीं आहे ते आपल्याला त्याच तत्त्वामधून मिळालेले आहे. माकडहाडांत साडेतीन वेटोळे घालून बसलेल्या कुण्डलिनीचे स्थान मूलाधार आहे आणि त्याचाच आविष्कार धरतीमाता आहे. त्याच तत्त्वानुसार आपण पूजेमध्ये घट बसवतो; अर्थात घट हा भूमातेचेच रूप असते.

आपल्या चेतनेच्या वृद्धीमधून आजपर्यंत मानवाने परमात्म्यापर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला; त्याचबरोबर पंचमहाभूत तत्त्वांपैकी भू-तत्त्व सोडून इतर चारी तत्त्वे त्याला समजली. पण भू-तत्त्व जाणण्यास वेळ लागत होता. कारण इतर चारी तत्त्वांचे कार्य समजल्याखेरीज भू-तत्त्व जाणणें अवघड होते. जसे स्वत:ची सर्व चक्रे नीट असल्याशिवाय दुसऱ्याला तुम्ही जागृति देऊं शकणार नाहीं, आणि उत्क्रान्तीचे कार्यही होणार नाहीं. म्हणून आकाश-वायू-जल-तेज या चार तत्त्वांना प्रसन्न करण्यासाठीं यज्ञयाग केले जात असत. त्यामधूनच ख्रिस्तांच्या काळी तेज(प्रकाश)तत्त्वाची उपासना होऊं लागली.आता सहजयोगाच्या माध्यमातून आपण भू - तत्त्वापर्यंत प्रगति केली आहे. हे युगच acquarius(म्हणजेच भूमिमाता वा कुंभ)आहे. म्हणूनच निसर्गामधून नारी-तत्त्व (feminine expression)कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. विरोधाभास एवढाच की त्याचा आविष्कार चुकीच्या मार्गानें- स्त्री- स्वातंत्र्य, पुरुष-स्त्री समानता, समान अधिकार, आर्थिक स्वावलम्बन इ-चालला आहे व व्यक्त होत आहे. हे अधिक ताणले गेले तर स्त्री पुरुष बनेल. पण त्यांत खऱ्या नारी- तत्त्वाला लोक विसरत आहेत. नारीतत्त्व म्हणजे सर्व बाबतीत पुरुष बनणे- आक्रमकपणा, अधिकार , स्पर्धा, जबरदस्ती इ. गुण प्रगट होणे - नव्हेच. हे समजण्यासाठी मूलभूत शहाणपण हवे. ख्रिस्ती धर्मात तर स्त्रियांना धर्मगुरु बनण्यासही परवानगी नसे. म्हणूनच खऱ्या अर्थानें मानव प्रगत झाला नाहीं. म्हणून आतां 'माते' ची भूमिका समजून घेण्याची वेळ आली आहे. पुरुषालासुद्धा मातृ-तत्त्व आत्मसात करण्याशिवाय उन्नति मिळवणें अशक्य आहे. अपार करुणा असल्यामुळें ख्रिस्त संत झाले. म्हणून सहजयोगामधें पृथ्वी-तत्त्व (Mother Earth) महत्त्वाचे आहे. किंबहुना पृथ्वी-माता ही सहजयोगाची महान शक्ती आहे.

तिचे कार्य कसे चालते पहा.एक उदाहरण- उदाहणादाखलच ते आहे - सांगते. नुसत्या शून्याच्या मागे कांही आकडा आला तरच शून्याला अर्थ येतो. परमात्मा हा तसा शून्यासारखा आहे; तो आहे पण त्याचे नुसते असणे स्वत:ला प्रकट करू शकत नाहीं. त्याचप्रमाणें पुरुष-तत्त्व स्वत; शून्यासारखे आहे. जसे उच्च दाबाच्या विद्युतवाहिन्या जमिनीचा स्पर्श होईपर्यंत धोकादायक नसतात. तसे भूमि-माता ही मातेच्या गर्भासारखी कुण्डलिनी धारण करते; गर्भामधून मूल बाहेर येईपर्यंत माता त्याला प्रेमाने व आस्थेने धारण करते व सांभाळ करते; त्याच्यावर कुठलाही अधिकार गाजवत नाहीं. उलट त्याला आकार देते. सहजयोगाच्या तत्त्वात पृथ्वी-मातेची हीच संकल्पना आहे आणि ती मूलाधारामध्यें व्यक्त होते. हे नीट समजून घेतले पाहिजे.

पाश्चिमात्य देशातील योगिनींसाठी हे जास्त महत्त्वाचे आहे. पुरुषांबरोबर सर्व बाबतींत नुसती 'बरोबरी 'करण्याची प्रवृत्ति टाकली पाहिजे; सहजयोगासाठी त्याचा कांहीं फायदा नाहीं. पृथ्वी-मातेप्रमाणें साम्भाळ करणें व वाढ घडवणें हे त्यांचे कार्य आहे. एरवी भू-मातेला लोक अनेक प्रकारे हानी पोचवतात, वाटेल तशी जमिनीची उधळपट्टी करतात. हा अनादर अति झाला की भू-माताही भूकंपामधून, दुष्काळातून तिचा संताप व्यक्त करते व त्यांना शिक्षा करते. हे थांबवण्यासाठी एकात्मतेची भावना वाढली पाहिजे.आपण सर्वजण तिचीच लेकरे आहोत हे समजून त्याप्रमाणें व्यवहार केला पाहिजे. तुम्हाला 'पूर्ण'पर्यंत पोचायचे आहे तेव्हा सहजयोग एकट्यानेंच करण्याचा

उपयोग नाही.म्हणून प्रत्येकानें स्वत:कडे खूप लक्ष दिले पाहिजे. पाश्चात्य लोकांना हे जास्त आवश्यक आहे. त्यासाठी मी काय करतो, माझे चित्त कुठे आहे असे स्वत:लाच विचारत रहा म्हणजे तुमचे 'मला-माझे' इकडचे लक्ष कमी होईल. सहजयोगांत आल्यावर तुम्ही सगळ्यांच्या बरोबर मिसळून रहायचे आहे. स्वत:च्या आवडी-निवडी इकडे लक्ष देऊं नका.

तुम्हाला आत्मा हा तुमच्यापासून आलेल्या मुलासारखा आहे आणि कुण्डलिनीद्वारे तुम्हीच त्याचे पोषण करणारे आहांत. तेव्हा इतर गोष्टींसाठी तुमच्याजवळ वेळच नाहीं. तुम्हीच तुमच्या ''स्व''ची आई झाला आहात; तेव्हा तो जास्त प्रकाशित कसा होईल, जास्त तेजस्वी कसा होईल याची काळजी घेतली पाहिजे. हीच तुमच्यामधील मातृत्व प्रेरणाशक्ती. हाच ध्यास घेतल्याशिवाय आत्मिक उन्नति कशी मिळवणार? बरेच जण माझ्याकडे त्यांच्या कौटुंबिक प्रश्नांबद्दल, आजारपणाबद्दल अजूनही कहाण्या घेऊन येतात; याचा अर्थ तुम्ही तुमच्या मुलाची (आत्मा)काळजी घेत नाहींत असेच मला वाटते. आणि हे फक्त स्वत:बद्दल आहे असेही नाहीं, इतर मुलांचीपण तुम्ही काळजी घेतली पाहिजे. मातृत्व ही शक्ती आहे म्हणून ती सामूहिकतेमध्यें कार्यरत झाली पाहिजे. मगच तुम्ही जबाबदार सहजयोगी व्हाल. <u>एक सहजयोगी जरी कमजोर, खराब झाला तरी त्याचा सामूहिक उन्नतीवर परिणाम होतो.</u> कांही खरोखरच खराब असले तरी ते मी पाहून घेईन; असे लोक आज ना उद्या बाहेर फेकले जाणारच आहेत. तुम्ही फक्त ' पूर्ण'त्वाची काळजी घ्या आणि ती फार मोठी जबाबदारी आहे. जे ही जबाबदारी स्वीकारत नाहींत त्यांनी त्यांच्या मुलाची(आत्मा) नीट वाढ होण्याकडे दुर्लक्ष केले असे म्हणावे लागेल. हे कार्य अनेक तऱ्हेने करतां येईल., तुम्ही त्या बाबतीत काय करुं शकता हे तुम्ही तपासा. हे केले नाहीं तर विशुद्धी चक्राला त्रास होतो. हे एका कानाने ऐकायचे आणि दुसऱ्या कानाने सोडायचे असे होउंदेऊंनका व त्याचा मनापासून प्रामाणिकपणे विचार करा.

आता आत्मा आणि कुण्डलिनी यांचा संबंध (Connection) मजबूत कसा ठेवायचा हा प्रश्न येतो. कारण हा संबंध पक्का जोडलेला नसेल तर कुण्डलिनीकडून आत्म्यावर संस्कार होणार नाहींत. सहजयोगामध्ये तुम्ही कुण्डलिनीवर कार्य करू शकता; हात हलवून बंधन घालून तुम्ही कुण्डलिनीवर नियंत्रण मिळवूं शकता. पण तसे नियंत्रण तुम्ही आत्म्यावर करूं शकत नाहीं. <u>त्यासाठी एकच एक मंत्र आहे तो म्हणजे ''मी आत्मा आहे '' या स्थितीवर येणे</u> आणि कुण्डलिनीला हृदयांत आणणें. म्हणजेच लहान मुलाचे जपून संगोपन करतो तसे आत्म्याला सांभाळणें.

पुरुषांनी लक्षांत ठेवले पाहिजे की अधिकार असला तरी त्यांनी समजूतदारपणा व कळकळ बाळगली पाहिजे; त्याचबरोबर महिलांनी लक्षांत ठेवले पाहिजे की त्यांनी उदार मन राखावं, कारण त्यांना सगळ्यांचा स्वीकार करून त्यांना पोसायचे आहे. पुरुषांनी पुरुषतत्त्व व महिलांनी मातृतत्त्व राखावें. कुण्डलिनी आपले काम करते तर चक्रें त्यांचे काम करतात. तसे हे आहे. तेव्हा पुरुष आणि स्त्रिया यांच्यामधील स्पर्धेने कांही होणार नाहीं; उत्क्रांती होण्याऐवजी फक्त क्रांतीच होईल. म्हणून आतां या परिस्थितीमध्ये जे काम राहिले आहे ते व्हायला पाहिजे आणि ते म्हणजे कुण्डलिनीचे जागरण. त्यासाठीं स्त्रीत्वाचे गुणच उपयोगी पडणार आहेत. म्हणून पुरुषांनी आक्रमकपणा इ. गुण टाकले पाहिजेत व जीवनांत आपण कुठें चुकत आहोत हे दोघांनी लक्षांत घेतले पाहिजे. ही लंबकासारख्या गतीमधून नव्हे तर चढत्या वर्तुळाकार गतीप्रमाणे घडणारी सुधारणा आहे. स्त्रीत्वाचे गुण ही त्यापाठीमागची शक्ति आहे. हे बोलण्या-पेहेरावात दिसणारे स्त्रीत्व नाहीं तर ही अंतरंगात -हृदयांत- असणारी भावना आहे; म्हणजेच प्रेम व करुणा व क्षमा शक्ति. धरतीमाता जशी सर्वांना धारण करते तसे. हाच भाव दृढ करून तुम्ही सर्वांनी त्यानुसार एकमेकांशी व्यवहार केला पाहिजे.

अर्थात आईलाही मुले चुकली की त्यांना रागवावे लागते; पण हे रागावणें - ओरडणे प्रेमापोटी असते, मुलांना सुधारण्यासाठी असते. ही धरती-माता सर्वांना धारण करते, तुमची व्हायब्रेशन्स खेचून घेते. म्हणून तुम्हीही त्या ऋणाची परतफेड करू शकता; म्हणजे तिनें जन्म दिलेल्या वृक्षांना, फळा-फुलांना चैतन्य देऊं शकता; तिने जे तुम्हाला दिले ते प्रेम, क्षमा, उदारता, करुणा सर्व कांहीं इतरांनाही देऊं शकता. एखाद्या आईसारखे; तुमच्या समोर आईची

प्रतिमा आहेच. ही मातृत्व-शक्ति क्षीण असते तेव्हां सहजयोगीही फक्त स्वत:च्याच मुला-बाळांना प्रेम देतात. पण हे बदलले पाहिजे; तुम्ही प्रत्येक माणसाबरोबर व प्रत्येक सहजयोग्याबरोबर तेवढयाच प्रेमाने राहिले पाहिजे.

तुम्हाला पूर्णत्वापर्यंत पोचायचे असेल, सामूहिकता बळकट करायची असेल तर स्वत:ला मनमिळाऊ व सज्जन बनवा. राग आलाच तर स्वत:लाच प्रेम कमी कां झाले म्हणून रागवा. पुरुषत्वाची जास्त वाढ झाल्यामुळेंच आजकालचे प्रश्न निर्माण झालेत. आपल्या नाकाला जेव्हां खाज उठते तेव्हां तिथें फक्त हाताने चोळतो; नाक कापून टाकत नाहीं. हे नीट समजून घ्या. सहजयोग्यांच्या सामूहिकतेत हे परिवर्तन झाले पाहिजे. ● ● ●

॥ या देवी सर्व भूतेषु मातृरूपेण संस्थित:
नम:तस्यै नम: तस्यै नम:तस्यै नमोनम: ॥

# अमृतवाणी

(प.पू.श्रीमाताजींनी वेळोवेळी केलेल्या उपदेशांतील अमृत-कण)

निर्विचारता ही तुमची तटबंदी आहे. ध्यानानें तुम्ही निर्विचारतेची जाणीव प्रस्थापित केली पाहिजे. तुम्ही उन्नतीकडे प्रगति करत असल्याची ती खूण आहे. यांत्रिक पद्धतीने नुसते धान करण्यात कांहीं फायदा नाहीं. (एकादशरुद्र पूजा १९९१)

अनेक दिवे लावले तरी त्यांची प्रेमानें काळजी घेतल्याशिवाय , त्यांच्याकडे लक्ष दिल्याशिवाय ते सतत तेवत कसे राहणार? आत्मचिंतनामधून स्वत:च्या बुद्धीमधून किंवा दुसऱ्या कुणी सांगितल्यामुळें तुम्ही सतत अधिकाधिक चांगले सहजयोगी बनण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे. (सहस्रार पूजा १९९६)

नवीन लोकांसाठीं मी या मानवस्वरूपापलीकडे कोणी नाहीं हे लक्षांत ठेवा व त्याबद्दल कांहीं बोलूं नका. (शिवपूजा १९८७)

भक्ती शिवाय तुम्ही परमात्म्यापर्यंत पोचू शकणार नाहीं. कुणी अधिकार म्हणून कुण्डलिनी जागृति मागेल तर ते होणार नाहीं. पण भक्तीबरोबर श्रद्धा हवी; त्या श्रद्धे ला कशानेहीं तडा जाता कामा नये. ज्याची श्रद्धा परिपूर्ण होते तो साक्षात परमात्माच बनतो

निर्विचारता जाणीवेमधें आली की तुम्ही आंतमधून पूर्ण शांति अनुभवता

(गुरु - पुजा १९९२)



# श्रीसूक्त

अंक क्रमांक ३-४ वरुन पुढे

कर्दमेन प्रजाभूता मयि संभव कर्दम ।
श्रियं वासय मे कुले मातरं पद्ममालिनीम् ॥११॥

विवरण :- या मंत्रात, लक्ष्मीचे वास्तव्य आपल्या कुलांत निरंतर रहावे म्हणून लक्ष्मीपुत्र कर्दम याला प्रार्थना केली आहे.

हे ''श्रीपुत्रा'' कर्दमा, तू माझ्या कुळात वास्तव्य कर. तू आमच्याकडे आलास, की तुझ्यावरील प्रेमाने तुझी आई म्हणजेच, कमळपुष्पांच्या माळा धारण करणारी साक्षात जगज्जननी आमच्या घरी- आमच्या कुळात वास्तव्यास येईलच. ती सदैव माझ्या वंशांत राहू दे.

आप: सृजन्तु स्निग्धानि चिक्लीत वस मे गृहे ।
नि च देवीं मातरं श्रियं वासय मे कुले ॥ १२ ॥

विवरण :- जलांना उद्देशून या मंत्रात प्रार्थना केली आहे. पाणी हे पंचतत्त्वांपैकी एक आहे. पाणी हे आर्द्रता दर्शविते, तृप्ती देते. ऋषींनी पाण्याच्या अशा या स्नेह - सान्द्र स्वरूपाकडे म्हणजेच पाण्याच्या आध्यात्मिक स्वरूपाकडे पाहिले आहे.

लक्ष्मीमातेच्या जलशक्तिस्वरूपापासूनच सर्व जग उत्पन्न झाले. म्हणून या आद्यशक्तीला - जलशक्तीला या मंत्रात आवाहन केले आहे, आणि तिने आपल्या कुळात सदैव राहण्याबद्दल तिचा पुत्र चिक्लीत याला अशी प्रार्थना केली आहे की, हे ''श्रीपुत्रा'' तू माझ्या घरी रहा आणि आपल्या लक्ष्मीमातेला आमच्या घरी निरंतर राहण्यास सांग.

आर्द्रां पुष्करिणीं पुष्टिं पिङ्गलां पद्ममालिनीम् ।
चन्द्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥ १३ ॥

विवरण : लक्ष्मीमातेला बोलावण्यासाठी, अग्नीला उद्देशून या श्लोकात प्रार्थना केली आहे.

लक्ष्मी म्हणजे शक्ती. जी शक्तिस्वरूपा आहे, जी पिंगट वर्णाची आहे, तांबडा आणि पिवळा या दोन रंगांच्या मिश्रणाने जो संमिश्र रंग तयार होतो, त्याला पिंगट रंग म्हणतात. हाच कुंडलिनी शक्तिस्वरूप लक्ष्मीचा पिंगट वर्ण.

जी सुवर्णमयी आहे, सुवर्णाप्रमाणे कांती असूनही जी चंद्राप्रमाणे शीतल, आल्हाददायक आहे, जी कमलमाला धारण करते, अश्या लक्ष्मीमातेला माझ्यासाठी बोलाव.

जिच्यावर गजशुण्डेने (हत्तीच्या सोंडेने)सतत जलाभिषेक होत आहे, त्या अभिषेक जलाने जिचे शरीर आर्द्र झाले आहे (मूलाधार चक्रावर श्रीगजाननाचे स्थान. तेथून गजशुंडेने शक्तीवर जलाभिषेक ) अश्या शक्तिस्वरूप लक्ष्मीमातेला बोलाव.

आर्द्रां य:करिणीं यष्टिं सुवर्णां हेममालिनीम् ।
सूर्यां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥१४ ॥

विवरण : जिचे हृदय आपार करुणेने आर्द्र आहे, म्हणजेच जी सांद्रकरूणा आहे, जिची कांती सुवर्णाप्रमाणे आहे, जी सुवर्णाच्या माळा धारण करते, जी स्वत: प्रकाशमान असून या चराचरसृष्टीला प्रकाशमय करते, अश्या लक्ष्मीमातेला हे अग्निदेवा आमच्यासाठी बोलव.

जिच्या हातात सदैव धर्मदण्ड आहे अश्या लक्ष्मीमातेला बोलव. ऐश्वर्य आले, तरी त्याचे नियंत्रण करण्याची शक्ती हवी. म्हणून अंत:करणात संयमशक्ती न्याय्य बुध्दी हवी. आमचा विवेक जागृत राहण्यासाठीच धर्मदण्ड धारण केलेल्या लक्ष्मीमातेला या मंत्रात आवाहन केले आहे.

क्रमश:

















# पुन: प्रक्षेपण

(अनुभवलेल्या, ऐकलेल्या, वाचलेल्या अनेक गोष्टी स्मृति-पटलावर कधीं कधीं कायमच्या टिकून रहात नाहींत. कोणत्या ना कोणत्या निमित्तानें त्या अचानक खोलवरुन, जाग्याही होतात. प.पू.श्रीमाताजींनी अवतरण व देव-देवतांबद्दल तसेच सहजयोगाबद्दल केलेली प्रवचनें हे एक सहजयोग्यांसाठी अनमोल धन आहे. त्या उपदेशाची जाणीव जागृत रहावी या सीमित उद्देशाने त्यांच्या वेगवेगळ्या प्रवचनांतील संक्षिप्त अंश या सदरामधून पुन्हा प्रसिद्ध करणें सहजयोग्यांसाठी उपयुक्त ठरेल या भावनेने हे सदर सुरू करीत आहोंत. परमचैतन्याच्या इच्छेनुसारच हा प्रयत्न फलदायी होवो एवढीच श्रीमाताजींच्या चरणी प्रार्थना आहे.)

## महालक्ष्मी -पूजा १९९२

महालक्ष्मीतत्त्व तुमच्या मधल्या नाडीमधे आहे. सामान्य जगव्यवहारातील असत्य व खोटेपणा आणि लोकांचा दिखाऊपणा तुमच्या लक्षांत आला की तुम्ही सत्याचा शोध घेऊं लागता; त्यांतून तुम्ही साधक बनूं लागता......महालक्ष्मीतत्त्व सुधारण्यासाठीं सहजयोग्यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे. स्वत:ला नीट राखण्यासाठीं सतत व्हायब्रेशन्सकडे लक्ष ठेवले पाहिजे. त्यांत सुद्धां एक अडचण असते की तुम्ही जेव्हां जास्त उजवीकडे किंवा डावीकडे झुकता तेव्हां व्हायब्रेशन्स नीट जाणवत नाहींत. जेव्हा कांहीं शारीरिक आजार असतात, राग आलेला असतो, अशांत असतो तेव्हां आपण मध्यामध्ये नसतो. म्हणून अलिप्त राहण्याची संवय लाऊन घेतली पाहिजे. ... कुठल्याही धर्माचा तिरस्कार करूं नका; धर्माचे जे पालन करत नाहींत त्यांना दोष दिलात तरी चालेल. लोकांच्या चुकीच्या वागण्यामुळें उगीचच धर्माला नांवे ठेवली जातात.....महालक्ष्मीतत्त्व आपल्याला संतुलन देते व आपले सर्व प्रकारे पोषण करते. त्यावर सोपा उपाय म्हणजे माझ्या कुण्डलिनीकडे चित्त लावा. त्यांतून निर्विचारता मिळेल, तुमचा अहंकार शांत होईल; 'माताजी सर्व करत आहेत' हे लक्षांत येईल. माझी कुण्डलिनी पूर्णपणें शुद्ध असल्यामुळें तुमचे कण्डिशनिंग दूर होईल..... महालक्ष्मीतत्त्वाचा सर्वात मोठा आशीर्वाद म्हणजे तुम्ही समाधानी राहता.......

## महासरस्वती - पूजा १९९२

महासरस्वतीतत्त्व उजव्या बाजूला कार्य करणारे आहे. अतिविचार करणारे किंवा आत्मसाक्षात्कार न मिळालेले कलाकार एक तर फार डावीकडे किंवा फार उजवीकडे जातात. उदा. फार उजवीकडे गेलेला चित्रकार पुढेपुढे फार उत्तान किंवा अर्थहीन कला दाखवतो; किंवा गायक पॉपसंगीतात रमतो, प्रसिद्धि-जाहिरात यांच्या मागे लागतो.... शेक्सपीयर सारख्या साहित्यिकांनी मानवी आशा- आकांक्षाचे अर्थहीन स्वरूप मांडले. ही लेखकाची आध्यात्मिक उंची दाखवते; आणि जीवनांतील उच्च मूल्यांचे श्रेष्ठत्व दाखवते. सॉमरसेट-मॉमसारखे लोक संतुलनांत असल्याचे त्यांच्या साहित्यातून दिसते.....डाव्या बाजूकडे झुकलेले दु:खकारक विषय मांडतात आणि पुढे-पुढें काल्पनिक विषयांत रस घेऊ लागतात किंवा मादक पदार्थाच्या आहारी जातात. ... टॉलस्टॅाय, दी-मोपासॉ यासारखे साहित्यिक संतुलनात असल्याचे त्यांच्या वाङ्‌मयातून जाणवते. पण खरं पाहिले तर आपल्याकडचे पूर्वीचे संस्कृत लेखन करणारे साहित्यिक संतुलनांत राहून कलानिर्मिति करत होते. साहित्य या शब्दांतच स-हित म्हणजे कल्याणकारक हा अर्थ दडलेला आहे..... खरा साहित्यिक जेव्हा समाजातील अनिष्ट घडामोडी पाहून उद्विग्न होतो तेव्हा तो आंतमध्ये सूक्ष्म दृष्टि मिळवून सत्य समजूं लागतो व ते आपल्या निर्मिती (कला,लेखन)मधून प्रगट करूं लागतो..... ही महासरस्वतीतत्त्व जागृत झाल्याची खूण आहे.... महासरस्वतीतत्त्व सर्व प्रकारच्या कलाकारांसाठी महत्त्वाचे आहे; ते तत्त्व जागृत असलेल्या कलाकारांना चटकन आत्मसाक्षात्कार मिळतो.... सहजयोगामध्यें वाचन करूं नये असे सांगितलेले नाहीं तर वाचनांतून सूक्ष्म अर्थ पाहण्याचा प्रयत्न असावा. चित्तामध्यें आत्म्याचा प्रकाश आल्याचे हे लक्षण आहे.....

## एकादशरुद्र पूजा १९८४

रुद्र ही शिवांची (परमेश्वर) संहार शक्ति आहे. क्षमा करणे हा त्यांचा स्वभावच असतो; आपण चुकीच्या गोष्टी करतो, मोहात अडकतो, अनैतिक गोष्टी करतो तरीदेखील तो क्षमा करतो. पण आत्मसाक्षात्काराचे आशीर्वाद दिल्यानंतरही जे अयोग्य गोष्टी करत राहतात तेव्हा त्याला संताप येतो आणि क्षमाशीलता कमी होऊन प्रकोप वाढण्यास सुरुवात होते. त्याआधी तो साक्षात्कारी आत्म्यांचे सर्व प्रकारे संरक्षण करतो, तुमचा राग शांत करतो, लोभ शांत करतो, क्षमा करण्याची शक्ति पुरवतो व तुम्हाला त्रास देणाऱ्यांना निष्प्रभ बनवतो. पण जे सहजयोगांत येतात व आपला अनिष्ट स्वभाव, प्रवृत्ति सुधारत नाहींत त्यांना तो क्षमा करत नाहीं; असे लोक सहजयोगाच्या बाहेर फेकले जातात. सहजयोग्याला न शोभणाऱ्या गोष्टी करणारे असेच दूर होतात.... जेव्हा कलकी स्वत: कृतिशील होते तेव्हा एकादशरुद्र व्यक्त होतात. ही संहार शक्ती पृथ्वीवर जे जे निगेटिव्ह आहे त्याचा नाश करते व जे सुष्ट आहे त्याचे रक्षण करते. ...म्हणून सहजयोग्यांनी उन्नतीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आपण आपल्या उन्नतीसाठीं, पूर्णत्वासाठीं काय करतो हे आपल्याला पाहिले पाहिजे.... एकादश म्हणजे अकरा रुद्रापैकी पाच भवसागराच्या डाव्या बाजूने येतात व आणखी पाच भवसागराच्या उजव्या बाजूने येतात. जर तुम्ही अ-गुरुच्या संगतीत असाल आणि त्याच्या आज्ञेनुसार तर डाव्या बाजूचे रुद्र कार्यरत होतात. यावर उपाय म्हणून मोहम्मद साहेबांनी शू-बीटिंग करायला सांगितले आहे. घरांत वा कुटुंबात अशी एखादी दुसऱ्याच गुरुच्या नादी लागलेली व्यक्ती असेल तर तिच्याबद्दल कसलीही सहानुभूति बाळगू नका; त्यांना रागावलात तरी चालेल. जेव्हा एखादा सहजयोगी स्वत:चा मोठेपणा मिरवूं लागतो, स्वत:चे ज्ञानप्रदर्शन केल्यासारखे वागतो, स्वत:ला कांही मीठ-पाणी वगैरे ट्रीटमेंट करण्याची जरुरी नाहीं अशी प्रौढी मिरवूं लागतो किंवा माझ्या नांवावर बेशक 'श्रीमाताजींनी मला सांगितले आहे' अशा थापा मारूं लागतो तेव्हां उजव्या बाजूचे रुद्र कार्यरत होतात. अकरावा रुद्र कार्यरत होतो तेव्हा त्या व्यक्तीला भयानक रोग होऊ लागतात.

## श्री हनुमान पूजा - ३१ ऑगस्ट १९९०

.....श्रीहनुमान हे आपल्यामधील एक महान दैवत आहे. ते आपल्या संपूर्ण उजव्या बाजूवर कार्य करतात आणि आपल्या मेंदू, मानसिक व वैचारिक प्रक्रियांवर नियंत्रण ठेवतात. त्यांच्याकडूनच आपल्या या कार्यामध्ये उपदेश, आधार व संरक्षण मिळते. ही अगदी लहान मुलासारखी निष्पाप देवता असूनही प्रत्यक्ष सूर्यालाही गिळंकृत करण्याइतकी शक्तिशाली आहे. .....म्हणूनच ते अति उजव्या बाजूच्या लोकांना आवरतात. त्यासाठी त्यांना अणिमा- महिमासारख्या अनेक सिद्धी प्राप्त आहेत व त्याचा कौशल्याने उपयोग करण्याची बुद्धि आहे. ते अजूनही सूक्ष्म बनून अणुपरमाणूंच्या सर्व कार्यप्रणालीवर नजर ठेवतात. संपूर्ण अवकाशावरही त्यांचे नियंत्रण व संचार चालूं असतो. त्यांच्या शक्तीमुळेंच ध्वनिलहरी वगैरेंचे कार्य चालते व आधुनिक उपकरणें चालतात. स्वाधिष्ठान चक्रापासून मेंदूपर्यंत उजव्या बाजूने त्यांचाच प्रभाव असल्यामुळें आपण विचार करू शकतो आणि त्यासाठीं योग्य विवेक वापरण्याची क्षमता आपल्याला मिळते.....ध्यानामध्ये निर्विचार - निर्विकल्प स्थिती देणारे श्रीगणेश आहेतच पण त्या स्थितीचे योग्य आकलन होऊन इतरांसाठी त्यांतून कल्याण साधण्याची बुद्धी- विवेक इ. आपल्याला श्रीहनुमानांकडूनच मिळते....श्री हनुमानांचा आणखी एक गुण म्हणजे ते श्रीरामांना परिपूर्णपणें शरणागत होते. त्यांची शरणागतता पराकोटीची होती. श्रीरामांनी कांहीही सांगितले तरी कसलाही विचार न करता अत्यंत तत्परतेनें व तडफेने करायचे याच्याशिवाय त्यांना दुसरा विचारच नव्हता.....श्रीहनुमान कुणाचा इगो प्रमाणाबाहेर वाढला की कांहीतरी क्लृप्ती करून त्याला खाली आणतात; शिवाय अहंकारी लोकांपासून तुम्हालाही संरक्षण पुरवतात.

# सहज : कांहीं ऐतिहासिक संदर्भ

कुण्डलिनीचे जागरण व आत्मसाक्षात्काराबद्दल बोलतांना प.पू.श्रीमाताजींनी सांगितलेले आहे की हे परमेश्वरी कार्य फार पूर्वीपासून अनेक मुनी व साधु-संत करत होते व आहेत. सहज-स्थितीबद्दलही पूर्वीच्या ग्रंथामधें व लोकवाङ्मयामधें उल्लेख आढळतात. त्यासंबंधी कांही सहजयोगी अभ्यासकांनी वेळोवेळीं गोळा केलेल्या माहितीचा हा गोषवारा. खाली उल्लेख केलेल्या कविता-दोहे-अभंगांची अवतरणे सोय म्हणून स्वैर भाषांतर रूपात सादर केलेली आहेत.

'सहज' चे ज्ञान हजारो वर्षापूर्वी होऊन गेलेल्या साक्षात्कारी संत-पुरुषांना माहित होते. कबीरांनी त्यांच्या कवनांमधें त्याचा उल्लेख पंधराव्या शतकांत केला असला तरी त्याच्या आधीं साधारण सात-आठशे वर्षे विशेषत: उत्तर भारतातील अध्यात्मिक उंचीवर पोचलेल्या संत-पुरुषांना त्याची माहिती होती. संस्कृत स्तोत्रांमधेही ब्राम्हण(म्हणजे ज्याने ब्रह्म जाणले आहे) हा उल्लेख वारंवार आढळतो. शंकराचार्यांनीही 'सौंदर्य लहारी' मधें कुण्डलिनीचा उल्लेख केला आहे.

बौध्द धर्मियांमधें ८ ते १० व्या शतकामधें 'सहजिया बुद्ध पंथ'(Sahajeya Buddhists) पूर्वभारतातील बंगाल इतिहासात आढळतो. सराहा, कान्हा, भुसुका असे कांही सहजी बौद्धकवि. त्यांनी त्याकाळच्या पण आतां लुप्त झालेल्या भाषेत काव्य रचना केल्या. त्यांना साक्षात्काराची जाण होती. असे मानले जाते. त्यांच्या कवनांमधें 'सहज' चा उल्लेख आढळतो. उदाहरणार्थ :

''सहजामधें कांही द्वैत उरत नाहीं.
सहज कानांनी ऐकू येत नाहीं,
डोळ्यांना ते दिसत नाहीं
सहज हा पूर्णावस्थेचा परमानंद आहे'' .......(सराहा)

''शांतचित्त झालेल्या माणसाचा प्रपंचच सहज होतो,
तो एक परिपूर्ण मानव बनतो '' ......... (कान्हा)

या सहजिया- बौध्द पंथांतील कांही साधू मुस्लिम आक्रमणामुळें आपला प्रदेश सोडून १०-१२ व्या शतकांत उत्तर भारतात आले व त्याच सुमारास उदय पावलेल्या नाथ-संप्रदायाच्या सम्पर्कात आले. मत्स्येंद्रनाथ हा नाथपंथाचा आदि-संस्थापक; त्याला गुरु गोरखनाथाची दीक्षा मिळाली. या पंथामधें गुप्त ज्ञान, गुरु-शिष्य माध्यमातून दिले जात असे. वेगवेगळ्या पंथाचे साधक डोंगर-पर्वतामधून फिरत असतांना एकमेकांच्या संपर्कात येत व ज्ञानाची देवाण-घेवाण होत असे; त्यांतून एका पंथाच्या संकल्पना दुसऱ्या पंथामधे थोडा-फार फेरफार होऊन मिसळून जात असत. अशा संपर्कामुळेच नाथपंथीयांची उपासना व तत्त्वे राजस्थानमधील मीराबाई, सुंदरदास, दादू इ.संतांच्या व कांहीं सूफी संतांच्या काव्य रचनेत आढळतात. ज्ञानेश्वर, मुक्ताबाई,नाम देव, एकनाथ व तुकाराम या मराठी संतांच्या परंपरा सर्वांनाच अवगत आहेत. नाथपंथीय योग्यांना मानवाच्या सूक्ष्म शरीरातील कुण्डलिनी, इडा-पिंगला, चक्रे इ.चे खोल ज्ञान होते.

या संतांच्या कांही रचनांचा उल्लेख :-

"रात्र नसेल तर दिवसच सहजामधें मिसळेल,
दिवसच नसला तर रात्रही सहजामधें विरून जाईल." ...... (गोरखनाथ)

"इडा-पिंगला या नाड्या मेरुदंडाला झाडावर चढलेल्या
वेलींसारखे विळखे घालून आहेत. इंगला नाडी सूर्यासारखी
तर इडा-नाडी चंद्रासारखी आहे. त्यांच्या मधोमध
सुषुम्ना नाडी आहे. हे तीन प्रवाह विशिष्ट बिन्दूवर एकत्र होतात."
........(सय्यद सुलतान; बंगाली सूफि-१६ वे शतक)

"मुंगी उडाली आकाशी
तिने गिळिले सूर्याशी " .........(मुक्ताबाई)

" या ज्ञानभक्ति सहज । भक्त एकवटला मज "॥ १८-११३० ॥ ..........(ज्ञानेश्वर)

" जीवेश्वराची ऐक्यता । सहजची असे स्वभावता ॥
तेथे अणुमात्र भेदवार्ता । न रिघे "
स्वभावे पाहता दर्पण । एकचि देखे दोहीपण ।
परि द्विधा नव्हेचि आपण । यापरि जाण जीव-शिव ॥ .......(एकनाथ)

" जिथे दोन संपतात तिथें सहज आहे."
" आत्म्याच्या सुंदर वेलीवर सहजाचे फूल उमलते."
" जाणीव सहजस्थितीला आल्यावर सर्व द्वैत संपते."
" जिथे चंद्र नाहीं, सूर्य नाही; जिथे दिवस नाहीं, रात्र
नाही अशा भूमीवर सर्व कांहीं सहजामधें विसावते. ........ (दादू : १५४४ ते १६०३)

" अत्यंत शुध्द वस्तुमात्रामधेच सहज उमलते
आणि सर्व धर्म एक होतात. अनेक संतांनी,
शंकराचार्य, सुखदेव, सनक इ. सर्वांनी सहजचाच मार्ग घेतला." (सुरदास : १५८६ ते १६८३)

" पानी में मीन प्यासी, मोहे सुन सुन आवत हांसी
आत्मज्ञानबिन नर भटकत है, कहाँ मथुरा-काशी. ........"(मीराबाई)

संत कबीर आणि गुरु नानक यांचा उल्लेख केल्याशिवाय हे पुनरावलोकन अपूर्ण राहील. श्रीमाताजींनी अनेक वेळा या दोन्ही संताचा गौरव आपल्या प्रवचनांत केला आहे; त्यांनी सांगितली आहेत.

कबीर हे १५ व्या शतकांतील संत कवि. त्यांचा बराचसा काळ बनारसमधें गेला. त्यांची कविता वरवर वाचली तर समजायला अवघड पण थोडा विचार केल्यावर त्याचा खोला अर्थ लक्षांत येतो. ते नुसतेच कवि नव्हते तर एक तत्त्वज्ञ आणि त्याच बरोबर ईश्वराशी सदैव समरस राहणारे साक्षात्कारी संत होते. त्यांनी कसल्याही धर्माचा व कर्मकांडाचा आग्रह ठेवला नव्हता: पण त्यांच्या व्यक्तिमत्वातच नम्रता,करुणा व शहाणपण रुजलेले होते आणि सत्याबद्दलचा त्यांना विलक्षण प्रेम होते.

कबीरबद्दल बोलताना श्रीमाताजी सांगतात," कबीर म्हणतात, बकरी जिवंत असताना 'मै-मै'ओरडत असते पण मारल्यावर तिची आतडी धुमकीवर वंगतात तेव्हा त्यातून 'तू हि, तूहि' असा आवाज येत राहतो. हेच सहजी होणें." या संतांच्या कांही काव्यपंक्ति :-

कबीर : " उंचे पानी ना टिकै, नीचे ही लहराय
नीचा होय सो भरी पिबें, ऊचा प्यासा जाय "

" रामनाम सब कहत है; ढग ढाकूर और चोर
जिस नाम से ध्रुव-प्रल्हाद तरे; वो नाम ही कुछ और."

गुरु नानक यांचा जीवितकाळ १४६९-१५३९. उत्तर हिंदुस्थानात त्यांनी शीख धर्म स्थापून मोठे कार्य केले. संत नामदेव त्यांच्या संपर्कात आले व त्यांच्या भजनांचा समावेशही नानकसाहेबांनी आपल्या गुरुग्रंथांत केला. त्यांच्या लिखाणातही सहजचा अनेक वेळा उल्लेख येतो.

नानक " नानक म्हणे हरीचे नांव सोडूं नका,
सहजच्या मार्गावर चालत रहा, तो तुम्हाला भेटणारच."

" गुरुची आज्ञा प्रमाण मानून त्याचे ध्यान करतात व
सहजच्या मार्गावर राहतात त्यांनाच परमात्मा भेटणार आहे"

" देवा माझ्या हृदयांत सदैव रहा
तूं माझ्या पाठीशी असलास की
सहजमार्गाने मला परमानंद भेटेल."

या सर्व वाङ्मयीन समृध्द पार्श्वभूमीबद्दल व सहजयोगाची विशेषत: समजावतांना प.पू.श्रीमाताजी म्हणतात, "कुण्डलिनीचे जागरण व आत्मसाक्षात्काराबद्दल आपल्या संस्कृतीमधे अनेक वर्षापासून पौराणिक ग्रंथांमधें अनेक उल्लेख आहेत. पण त्या थोर संतपुरुषांची भाषा सामान्य लोकांना उमजली नाहीं आणि त्याबद्दल उलट-सुलट अर्थ काढले गेले. आत्मसाक्षात्कारानंतरच या थोर प्रेषितांनी गुणगान केलेल्या सहजयोगाच्या परिपूर्ण आनंदाची अनुभूति मिळूं शकते.... "

# सहस्रार दिवस, मुंबई, १९८३

सहस्त्रार उघडण्याच्या क्रियेस तेरा वर्षे पूर्ण होऊन चौदावे वर्ष सुरू झाले आहे. १४ व्या वाढदिवसाचे विशेष महत्त्व आहे. कारण मनुष्य १२ वेगवेगळ्या स्तरांवर रहात असतो. ज्यावेळी तो १४ वी स्थिती ओलांडतो त्याचवेळी तो संपूर्ण सहजयोगी होतो. आपणास सात चक्रे तर माहीतच आहेत. त्याशिवाय आपणास विशेष परिचित नसलेली किंवा ज्यांच्याविषयी आपण विशेष चर्चा करीत नाही अशीही काही चक्रे पुढीलप्रमाणे आहेत.

चंद्राचे चक्र : ललित चक्र, सूर्याचे चक्र : श्री चक्र , हंस चक्र , सहस्राराच्या वर आणखी चार चक्रे आहेत. ती म्हणजे, अर्ध बिंदू , बिंदू , वलय, प्रदक्षिणा.

आपले सहस्रार उघडल्यानंतर आपणास या चक्रांपर्यंत पोहोचावयाचे आहे.या चार चक्रांमधून पार झाल्यावरच तुम्ही खरे सहजयोगी झालात असे समजावे. निराळ्या दृष्टिकोनातून विचार केला तर असे दिसेल की, आपणास सहस्रारापर्यंत पोहोचण्यास चौदा चक्रांमधून जावे लागते. इडा आणि पिंगला नाडयांवर ७/७ अशा चौदा चक्रांमधूनच कुण्डलिनी पार होते. जी नागमोडी वळणाने वर चढते. अशा तऱ्हेने कुण्डलिनी शास्रात १४ चे महत्त्व फार आहे.'रजन' आणि 'विराजन' या शब्दांविषयी मी अनेक वेळा सांगितले आहे. ' रजन'म्हणजे राज्य करणे अथवा अधिपती होणे. ' विराजन' म्हणजे धारण करणे. आता तुम्ही नारळाच्या झाडांखाली बसलेले आहात. नारळ म्हणजे श्रीफळ. या झाडाविषयी आपण कधी विचार केला आहे काय?ते समुद्रकिनारीच चांगले उगवते कारण समुद्र म्हणजे धर्माचे प्रतीक आणि जेथे धर्म वसतो तेथेच श्रीफळांचे वृक्ष फोफावतात.

मिठाचेही असेच महत्त्वाचे स्थान आहे. समुद्रात सर्वत्र क्षार आहेत. क्षारांनीच जीवनास प्राणशक्ती मिळते. नारळाच्या वृक्षाबाबतही असेच घडते. हा वृक्ष क्षारयुक्त पाणी (जीवनरस) शोषून घेतो. तो रस चौदा स्थितीतून वर चढतो. त्यातील खारटपणा खालीच रहातो आणि श्रीफळात मात्र गोड पाणी निर्माण होते. देवीच्या पूजेत श्रीफळ अर्पण करावयाचे असते त्याशिवाय पूजा संपन्नच होत नाही. श्रीफळाचे वृक्षातील प्रत्येक घटकाचा (पानांपासून मूळांपर्यंत) मानवास उपयोग होतो. श्रीफळसुद्धा तुमच्या सहस्राराप्रमाणे आहे. तुमच्या शिरांवरील केसांप्रमाणेच श्रीफळाच्याही डोक्यावर केस आहेत. हा केशसंभार कवटीप्रमाणेच श्रीफळाची कवटी असते. त्याखाली पांढरा राखी थर आहे. त्याभोवती मेंदूचे संरक्षण करण्यासाठी एक द्रवपदार्थ असतो. श्रीफळातही आत पाणी असते अशा प्रकारे श्रीफळ आणि आपले सहस्रार एकच आहे।मनुष्यास जागृतीपूर्वी सर्व कार्यात वृथा अभिमान, गर्व व अहंकार याच गोष्टी ज्ञात असतात. त्यांच्याच आधारे तो सर्व व्यवहार करीत असतो. परंतु कुण्डलिनी जागृत झाल्यावर तो आत्म्याशी एकरूप होऊन व्यवहार करतो. आत्मा आणि चित्त एकरूप होते व आपणास खऱ्या गोष्टींचा साक्षात्कार होतो. म्हणूनच योगी लोक ' सच्चिदानंद - सच्चिदानंद ' असे म्हणत असतात. याचा अर्थ सत-सत्य, चित-चित्त व आनंद - आनंद सत्यामुळे चित्तास झालेला आनंद.

. वृक्ष लहान असताना आपली मुळं जमिनीत रुजवतात, नंतर हळू हळू खोलवर नेतात, आधार घेतात, जमिनीतून जीवनरस शोषतात. वर वर वाढ होत उंच होतात शेवटी श्रीफळ धारण करतात. आपणही आपले चित्त मुळांप्रमाणे खोल रुजवले पाहिजे आणि सहस्रारापर्यंत पोहचले पाहिजे.आजच्या शुभ प्रसंगी तुम्ही आला आहात तर या श्रीफळा प्रमाणे बना आणि ते श्रीफळ माझ्या चरणी अर्पण करा. सहजयोग समजायचा असेल तर श्रीफळाचे उदाहरण घ्या. श्रीफळ हा साक्षात 'सहजयोग' आहे. ज्यांना सहजयोग ज्ञात नाही त्यांना तो समजावून सांगा.

सहजयोगात काही साधे व सोपे नियम आहेत. तुम्हास त्यांची सवय झाली पाहिजे, रोजच्या व्यवहारात ते पाळले गेले पाहिजे. आणखी एक गोष्ट लक्षात ठेवा की वृक्ष ज्याप्रमाणे वाऱ्याने झुकतात, वाकतात त्याप्रमाणे आपणही व्यवहारात नतमस्तक व्हावयास हवे.''ज्या सहस्रारात प्रेम वास करते अशाच सहस्रारात माझा वास असतो, मनात नेहमी प्रेमभावना असावयास हवी. '' अशा रीतीने ज्यावेळी आपण वागाल त्यावेळी खऱ्या अर्थाने आपण १४ वा सहस्रार दिन साजरा केल्यासारखे होईल.

• • •



## गुरुतत्त्व जागृत करणे
इंग्लंड १९८३
भाषण (सारांश)

आज आपण सगळे गुरुपूजेच्या निमित्ताने येथे जमलो आहोत. तुमचे सर्वांचे गुरु सर्वप्रथम श्रीमाताजी आहेत. यापूर्वीही अनेक गुरुपूजा झालेल्या आहेत. आपणास आश्चर्य वाटेल की गुरूपूजा श्रीमाताजी लंडनमध्येच का घेतात? पुराणात म्हटलेआहे की, आदिगुरू दत्तात्रयांनी मातेची पूजा 'तमसा'नदीच्या काठी केली. तमसा म्हणजेच आजची 'थेम्स' नदी! आजची गुरूपूजा वौशिष्ट्य पूर्ण आहे. कारण ही तुमच्या गुरूंची - श्रीमाताजींची ६० वी पूजा आहे. कारण माझ्या वयास ६० वर्षे पूर्ण होत आहेत. ऋतंभरा प्रज्ञेच्या प्रभावाखाली आपण येथे परत जमलेलो आहोत. याच स्थळी गुरुदत्तात्रयांनी ध्यान-धारणा आणि पूजा केलेली आहे. अशा पवित्र पार्श्वभूमीवर आपण आपले गुरुतत्त्व जागृत करून घेण्यासाठी जमलो आहोत. आपणा सर्वांमध्ये गुरुतत्त्व वास करीत असेल आणि ते जागृत केले पाहिजे म्हणून ही गुरुपूजा ॥

प्राचीन काळी गुरू काही नियम घालून देत, ते पाळलेच गेले पाहिजेत असा दंडक असे. त्यामुळे नियमांचे पालन काटेकोरपणे होई, कडक नियमांमुळेच पूर्वी कार्य होत असे. आता तुमच्यातील गुरुतत्त्व जागृत व्हावे असे वाटत असेल तर तुम्हीसुद्धा काटेकोरपणे नियम पाळले पाहिजेत. जे लोक आळशी व ढेपाळलेले आहेत जे कशाचाही त्याग करू शकत नाहीत, जे सुखासीनतेच्या आहारी गेले आहेत, ते गुरु होऊ शकत नाहीत गुरु होऊ इच्छिणाऱ्याने परिस्थितीशी कठोरपणे सामना केला पाहिजे व अतिशय कठोर परिश्रमाची तयारी पाहिजे. तुमच्या वासनांवरही तुमचे नियंत्रण हवे. अन्यथा गुरुतत्त्व जागृत होणे कठीणच आहे.

गुरु होण्याअगोदर तुम्ही परीपूर्ण सहजयोगी व्हावयास हवे. पूर्णावस्थेत पोहचल्यावर दुसऱ्यास योगदान देण्यास शिकले पाहिजे. जर तुम्ही अर्थव्यवहारास चिकटून असाल (पैशांचे व्यवहार), खाण्यापिण्याच्या सवयींचे आधीन झालेले असाल किंवा केवळ सांसारिक, ऐहिक गोष्टींनाच महत्त्व देत असाल तर तुम्ही दुसऱ्यास योग देऊ शकणार नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे शारीरिक व ऐहिक गोष्टींमध्येच तुमचे चित्त अधिक प्रमाणात गुंतवून ठेवू नका. अशा पूर्णावस्थेला अतीत अवस्था म्हणतात, ज्यात सर्व गोष्टी आपोआप घडून येत असतात. त्यासाठी मुद्दाम लक्ष घालावे लागत नाही. प्रत्येक सहजयोग्याने'' अतीत''अवस्थेला यावयाचे आहे म्हणजे प्रत्येक गोष्ट आपोआप नकळत घडत राहील. तुम्हाला कळणारही नाही की, गोष्टी कशा घडल्या.

जे जे लोक सर्वसाधारणपणे चांगल्या स्थितीत आहेत त्यांनाच तुमच्या पाया पडू द्या. त्याचप्रमाणे तुम्ही सद्धा अशाच व्यक्तींना नमस्कार करा की ज्या अवतार स्वरूप आहेत. इतर कोणाच्याही पायांवर आपण जाऊ नये.

भारतात आपल्या आईवडिलांच्या पाया पडण्याची प्रथा आहे. तुम्ही

स्वतः त्यांचेच प्रतिनिधी असल्याने यास काही हरकत नाही. ज्या ज्या व्यवसायात तुमचे शिक्षक आहेत त्यांनाही नमस्कार करणेस हरकत नाही.

गुरुतत्त्व जागृत होण्याकरिता तुम्ही स्वतःला पूर्णतः घडवले पाहिजे. हे कसे करावे? तर आपणा सर्वामध्ये दहा तत्त्वे आहेत. त्या सर्वांवर मेहनत घेऊन ती जागृत करावी. रोज १/१ चक्र घेऊन त्याची शुद्धता करावी. कुठल्या चक्रात दोष निर्माण झाला आहे हे तुम्हास ओळखता आले पाहिजे. म्हणजे तुम्हास त्याची स्वच्छता करता येईल. केवळ कोणाकडून किंवा माझ्याकडून लिंबू व मिरच्या मंत्रून तुमच्यातील दोष नाहीसे होणार नाहीत. काही काळापुरते तुम्हास बरे वाटेल. परंतु पुढे मेहनत घेतली नाही तर तेच दोष कालांतराने पुन्हा उद्भवतील. यासाठी रोजच्या रोज ध्यान-धारणा वाढवून स्वतःची शुद्धता करावी. सद्गुरु होण्याकरता 'अतीत' अवस्था तुमच्यात येणे जरुरीचे आहे.

या अवस्थेत असणाऱ्यापुढे लबाड लोक, बाधाग्रस्त, खोटे-नाटे व्यवहार करणारे लोक जेव्हा येतात तेव्हां त्यांच्या सर्वांगास कापरे भरू शकते; त्यांच्या डोळ्यात अपराधीपणाची भावना दिसून येते. व ते आपोआप बाजूला होतात.

एकदा मला सांगण्यात आले की, एका घरातील मोलकरीण बाधिक आहे. तिच्यापासून ते कुटुंब मुक्त होईल असे श्रीमाताजी म्हणाल्या. त्यानंतर एकदा विमानतळावर जात असतांना मुद्दामच श्रीमाताजी त्या घरासमोर गेल्या, थोडावेळ थांबताच ती मोलकरीण घराबाहेर आली तिने 'श्रीमताजींकडे' पाहिले आणि जवळच असलेल्या एका घाणेरड्या डबक्यात ती जाऊन पडली असे कधी कधी होते.

असेच एकदा विमान प्रवासातही घडले. विमानात आम्हास बघून एक प्रवासी उड्या मारू लागला. त्याला एका सहजयोग्याने विचारले "काहो आपण ट्रान्स मेडिटेशन पंथाचे आहात कां? " तुम्हास कसे कळले? असे तो म्हणाला. तो सहजयोगी म्हणाला की अशा गोष्टी आम्हास लगेच समजतात. जे बाधित लोक आहेत ते असेच विचित्र वागतात. अशा लोकांना अत्यंत कौशल्याने आणि हुशारीने आपलेसे केले पाहिजे. त्यांच्याशी सौजन्याने व मृदुपणे वागावे. सुरवातीस हे लोक विमनस्क मनःस्थितीत असतात. त्यांच्याशी प्रेमळपणे वागून संस्कार केले तर ते योग्य मार्गावर येतात.

गुरुपद मिळण्याकरता सोशिकपणा व चिकाटी हवी. त्याचबरोबर परमेश्वराच्या प्रभुत्वावर संपूर्ण विश्वास हवा। अशा रीतीने तुम्ही गुरु होऊ शकता. अगोदर सांगितल्याप्रमाणे प्रथम दहा तत्त्वांना आपलेसे करा. त्यांच्यावर प्रभुत्व मिळवले की, विशद्धीची सोळा तत्त्वेही सुटतात.

एकदा का ही सोळा तत्त्वे पार केली की तुम्ही आज्ञाचक्रावर येता. आज्ञाचक्रावर त्याग करता, त्यावेळी तुम्ही पूर्णत्वास पोहोचलेल्या स्थितीत असता. सर्व चक्रांची शद्धी झाली पाहिजे. सर्व चक्रांवर लक्ष केंद्रित करा. अशा रीतीने तुम्ही एक अत्यंत अवघड गोष्ट सहज साध्य कराल. सहजयोग हा सोप्यातला सोपा मार्ग आहे. त्याचा पुरेपूर फायदा घ्या. हाच ह्या गुरुपूजेच्या निमित्ताने माझा आशीर्वाद आहे. पुढील वर्षी तुम्ही गरु झालेले असले पाहिजे.

मी आता माझ्या वयाची ८० वर्षे पूर्ण केली आहेत. यापुढे माझा वाढदिवस समारंभ करू नका. सहजयोगाचा आदर्श नमुना बना. मी सांगते त्यानुसार वागा. परंतु काही लोक याचा निराळाच उपयोग करतात. माझ्या नावाचा गैरवापरही करतात. मी असेच एकदा एका गृहस्थास सांगितले "जा उपवास करा. त्यांनी स्वतः तर उपवास केलाच पण आपणच एकट्याने का करावा म्हणून माझे नाव सांगत इतरांनाही उपवास करायला लावला. असे प्रसंग बरेच वेळा घडतात. असे व्हावयास नको, असो. तर सहजयोगाची तत्त्वे व आदर्श नमुने आचरणात आणा. व गुरुतत्त्व जागृत करून घेऊन गुरु बना.

सर्वांना अनंत आशीर्वाद।

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥






कबेला

नारगोळ

८ मे२००५







भूगांव आश्रम, पुणे